## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २६ (प्रतिनिधी) : सन १९९३ पासून ज्या विद्यार्थ्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून पदवी प्रमाणपत्र नेलेले नाही अशा विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून ज्या विद्यार्थ्यांनी तातडीने पदवीप्रमाणपत्र विभागातून पदवी प्रमाणपत्र घेवून जावे असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

विद्यापीठाकडून दरवर्षी दीक्षांत समारंभ आयोजित करून विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जाते. आजपर्यंत ३२ दीक्षांत समारंभ झाले आहेत. प्रत्येक दीक्षांत समारंभानंतर विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रांपैकी काही प्रमाणपत्रे विद्यापीठाकडे आहेत. यात मुख्यत: टपालातून परत आलेले, विद्यार्थ्यांनी गुणपत्रकाच्या छायांकित प्रती न जोडलेले, पात्रते अभावी राखीव असलेले, उशिरा प्रिंटींग करून आलेले, त्याच प्रमाणे ज्या विद्यार्थ्यांनी अर्जा स्वत: प्रमाणपत्र घेवून जाणार असल्याचे नमूद केले होते अशा बहुतांश विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडे अद्याप अवितरीत स्वरूपात पडलेली आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे ई-मेल आहेत त्यांना ई-मेल द्वारे सुचित करण्यात आले आहे. याशिवाय अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी पदवी प्रमाणपत्र घेवून न गेलेल्या विद्यार्थ्यांनी अंतीम वर्षाच्या गुणपत्रकाची सत्यप्रत आणि ओळखदर्शक पुरावा दाखवून विद्यापीठाच्या पदवीप्रमाणपत्र विभागातून पदवीप्रमाणपत्र घेवून जावे तसेच 0257-2257319 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २६ (प्रतिनिधी) : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत समाजकार्य महाविद्यालये, विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील समाजकार्य विभाग आणि नंदूरबार येथील कबचौउमवि संचलित आदिवासी अकादमी येथे नव्याने सुरु होणाऱ्या एम.एस.डब्ल्यु. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाची केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि. २४ जून, २०२४ पासून सुरु करण्यात आली आहे.

सदर प्रवेश प्रक्रियेबाबत प्रवेश माहिति पुस्तीका, ऑनलाईन माहिती व नोंदणी अर्ज इ. विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. **विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क रु. ६००/- ऑनलाईन पेमेंट गेटवे द्वारे भरण्याची सुविधा नोंदणी अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.** भरलेला प्रवेश अर्ज व प्रवेश पात्रते संदर्भातील सर्व कागदपत्रे स्कॅन करुन प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्रांवर (ARC) अपलोड (Upload) करावयाची आहे. विद्यार्थांना ऑनलाईन नोंदणी अर्ज दि. २४ जून, २०२४ पासून उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. नोंदणी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ०९ जुलै, २०२४ पर्यंत आहे. प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज व आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे जवळच्या प्रवेश अर्ज स्विकृती केंद्राला (ARC) जाऊन अर्ज व कागदपत्रांचे व्हेरीफीकेशन करावयाचे आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केले आहे अशा विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा (CET) दि. १४ जुलै, २०२४ रोजी १) जळगाव जिल्ह्यासाठी- स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, २) धुळे जिल्ह्यासाठी- एस.एस.व्ही. पी.एस. संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे ३) नंदुरबार जिल्ह्यासाठी- जी.टी.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार या परीक्षा केंद्रांवर १ तास १०० गुणांची बहूपर्यायी (MCQ) पध्दतीने प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या ऑनलाईन दोन फेऱ्या ( I & II Round) होतील. प्रवेश नोंदणी प्रक्रिया पुर्ण झाल्यावर, सामान्य यादी जाहीर होईल. त्यानंतर गुणवत्ता यादीवर काही आक्षेप असल्यास ते नोंदवता येतील. त्यानंतर अंतीम यादी जाहिर केली जाईल. प्रवेशासाठी पहिली व दुसरी फेरीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. ऑनलाईन अलॉटमेंटसाठी ऑप्शन फॉर्म भरतांना विद्यार्थ्यांनी कमीत कमी एक ऑप्शन भरणे आवश्यक आहे. तसेच जेवढी महाविद्यालये आहेत, तितके Preference विद्यार्थी देवू शकतो. CAP Round द्वारे Online Allotment करण्यात येणार आहे. पहिल्या फेरीनंतर विद्याथ्र्यांच्या इच्छेप्रमाणे महाविद्यालय न मिळाल्यास Freeze आणि Float असे दोन पर्याय देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करुन पुढील पैकी जवळच्या प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्रांवर व्हेरीफीकेशन करावे. स्वी**कृती केंद्रांची नावे** :- १) स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव २) लोकसेवक

मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव ३) भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा ४) श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीचे पंडीत जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर ५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ६) महात्मा फुले एम.एस.डब्ल्यु. व मातोश्री झ.मो. तुर्खिया बी.एस.डब्ल्यु. महाविद्यालय, तळोदा असे एकूण सहा केंद्र प्रवेश अर्ज स्विकृतीसाठी निश्चित करण्यात आलेले आहे.

तरी वरील अभ्यासक्रमास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचा प्रवेश निश्चित करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) भेट देवून सविस्तर माहिती समजून घ्यावी. सदर प्रवेश प्रक्रियेत काही अडचण आल्यास डॉ. दाऊदी हुसैन, पध्दती विश्लेषक यांच्याशी दूरध्वनी क्र. 0257- 2257158 वर किंवा ई-मेल cap@nmu.ac यावर संपर्क साधावा, अशी माहिती प्रवेश प्रक्रियेचे कार्याध्यक्ष प्रा. किशोर एफ. पवार यांनी दिली.

................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २६ जून, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी